महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

# पक्षीमित्र

■ वर्ष पहिले ■ अंक ४ था ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ ऑक्टोबर २०११

## संपादकीय...

### माळढोक वाचेल ना ?

कमी पावसाच्या सोलापूर व नगर जिल्ह्याच्या माळरान क्षेत्रावर ८५०० चौ.कि.मी. क्षेत्रावर माळढोक अभयारण्य जाहीर झाले होते. हाच भाग काळविटांसाठीदेखील प्रसिध्द होता. एवढ्या विस्तीर्ण क्षेत्रावर अभयारण्य घोषित होऊनही त्याच्या देखरेखीची पुरेशी व्यवस्था होती कुठे ? संरक्षित क्षेत्रातील गावांच्या तक्रारी असायच्या. हरणांनी पिके उध्वस्त केल्याबद्दलच्या तक्रारी असायच्या. अभयारण्य जाहीर होण्यापूर्वीही नालज परिसरात माळढोक हमखास दिसायचे. आपले सोलापूरचे पक्षीमित्र बी. एस. कुलकर्णी माळढोकांच्या संरक्षणाबद्दल पोटतिडीकेने बोलायचे. अभयारण्य क्षेत्रातील जमीनविक्री, फेरफार यावर निर्बंध असल्याने ग्रामस्थांच्या तक्रारी असत.

शेवटी हे एवढे विस्तीर्ण क्षेत्र व्यवहार्य आहे का ? याबद्दल खल होऊन, गावकऱ्यांच्या अडचणींचा विचार करून ते क्षेत्र १२२२ चौ.कि.मी. पर्यंत घटविण्यात आले आहे. कोणत्याही अभयारण्याचा आकार कमी करण्याचा प्रस्ताव आला की सामान्यपणे निसर्गप्रेमींचा त्याला विरोध असतो. तसा विरोध झाला नाही. पण आता मर्यादित केलेल्या क्षेत्रावर माळढोकांचे संरक्षण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न व्हायला पाहिजेत अशी अपेक्षा निसर्गप्रेमींनी व्यक्त केली आहे.

अभयारण्यातील व्यवस्थापनासाठी अल्प मुदतीचा वा दीर्घ मुदतीचा आराखडा नीट आखला गेला पाहिजे व आता मर्यादित झालेल्या क्षेत्रावर व्यवस्थितपणे राबविला गेला पाहिजे. नियमित गस्त प्रभावी झाली पाहिजे. शिकार, वणवा रोखण्यासाठी अथक प्रयत्न व्हावे लागतील.

माळढोक मादी घरटे करीत नाही. कुठेही माळरानावर अंडे देते. त्याला कुत्री, कावळे यांचा धोका असतो. विणीच्या हंगामात अशा अंड्यांच्या रक्षणाची काळजी घेतली जावी. त्याच्या कृत्रिम प्रजननासाठी प्रयत्न ऐकिवात नाही पण सापडलेल्या अंड्याची उबवण यशस्वी ठरू शकेल.

आपले एक पक्षीमित्र डॉ. प्रमोद पाटील माळढोक अभयारण्यात माळढोकांची वाढ होण्यासाठी काय आणि कसे प्रयत्न झाले पाहिजेत यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांच्या व व्यवस्थापनाच्या प्रयत्नातून माळढोक नुसता वाचणारच नाही तर विस्तारेल अशी आशा करूया.

दिगंबर गाडगीळ
३९, आनंदवन कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक - ४२२ ००५
फोन : (०२५३) २५७७९६८, मोबा. ९८८१०७९७११
E-mail : dkgadgil@indiatimes.com
dgadgilo9@gmail.com

महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजच **सभासद व्हा !**

एकदाच रु. ५००/- भरा व आजीवन सभासदत्व मिळवा.

आपण सभासद असाल तर अजून एक सभासद बनवा.

**सभासद कसे व्हाल ?**

१) डी.डी. / मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमित्र'' या नावे चिपळूण येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.

बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, चिपळूण शाखा.

खात्याचे नाव : महाराष्ट्र पक्षमित्र.

बँक खाते नं. : ६००३६८१२०१७

खात्यात पैसे भरुन त्वरीत मेलने कळवणे तसेच सभासदत्व अर्ज भरुन पोष्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे.



टीप : हा अंक आपल्या मित्रांपर्यंत पोचवा !

# एका पक्षीमित्राची अखेर

रमेश लाडखेडकर, ज्यांना अनेक लोक 'लाडखेडकर सर' आणि 'बंडू भाऊ' या नावाने ओळखत त्यांचं दि. ११ जानेवारी २०११ ला दु:खद निधन झालं. एका अतिशय वैविध्यपूर्ण आणि अनोख्या व्यक्तिमत्त्वाला आम्ही पारखे झाल्याची भावना अनेकांच्या मनात आहे. जवळच्या लोकांना, नातेवाईकांना कोणी गेल्याचं दु:ख होतंच पण सरांच्या जाण्यानं अनेकांचं मोठं नुकसान झालेलं आहे. सरांच्या अंत्यसंस्काराचा औपचारिक कार्यक्रम पार पाडून पुण्याकडे जाणाऱ्या खाजगी बसमधून कारंज्याला परत येत होतो. काही मध्यमवयीन स्त्रियांचा ग्रुप गप्पा मारत होता. तेवढ्यात सरांच्या जाण्याचा विषय त्यांच्या बोलण्यात आला.. एक बाई सांगत होत्या, 'फार चांगले शिक्षक होते ते, आम्हाला शिकवलंय त्यांनी खेळामध्ये त्यांना फार रस होता'. त्या वाक्यात एक मनस्वी हळहळ जाणवत होती. सरांच्या फार संपर्कात न आलेल्यांनाही मनापासून वाईट वाटत होतं, मग ज्यांनी त्यांच्या सोबत अनेक क्षण घालवले त्यांची काय अवस्था असेल ? शोकसभेत गोपाळराव ठोसर सरांचे मौन अनेकांच्या भावना व्यक्त करून गेले.



सरांबद्दल अनेकांना, ते पक्षीमित्र चळवळीचे मुख्य कार्यकर्ते आणि मग मार्गदर्शक होते. नूतन भारत शाळेत शिक्षक होते. बास्केटबॉल, हॉकी यांसारख्या खेळांची आवड वाढवण्यात त्यांचा वाटा होता, वगैरे माहीत आहे. पण सरांनी माणसं जोडण्याचं, त्यांना समजून घेत घडवण्याचं आणि सोबतच त्यांच्या कामाचं 'Institutionalization' करण्यामध्ये जी कामगिरी करून दाखवली त्याला तोड नाही.

हा लेख लिहिताना अनेकदा थांबावं लागतंय, अनेक भावना अंतकरण जड करताहेत. पण सरांवर लिहिताना भावनांपेक्षा त्यांची काम करण्याची अनोखी पध्दत आणि त्यांची उणीव भरून काढण्यासाठी आपण काय करू शकतो याचा अधिक विचार करावा असे वाटते. त्यांनाही हेच आवडलं असतं.

१९८८-८९ साली आमचा तरुण मुलांचा नेचर क्लब चालवताना आमचा सरांशी संबंध येणं भागच होतं. मोजक्या जेष्ठ पक्षीनिरीक्षकांपैकी ते एक होते. अनेकदा पक्षी, ओळखण्यात अडचण आल्यास आम्ही वर्णन करून सांगायचो आणि तो अमुक अमुक असेल का ? अशी विचारणा करायचो.... सरांचे उत्तर तयार असायचे 'असू शकतो'. असे २-३ वेळा नव्हे, नेहमीच होऊ लागले तेव्हा मी निराश झालो. त्या 'असू शकतो' या उत्तराचा अर्थ अनेक वर्षांनी मला कळला. त्यांच्या त्या उत्तरामुळेच आम्ही पक्षी ओळखायला शिकलो. स्वावलंबनाचा हा पाठ सरांनी किती सहज-सुंदरतेने अनेकांना अनेक क्षेत्रातल्या लोकांना पढवला आहे.

अजय आणि योगिनी डोळके, नरेंद्र धारे, डॉ. अनिल पिंपळापुरे, प्रद्युम्न सहस्त्रभोजनी, संजय सोनटक्के, रमेश बक्षी, जयंत गडकरी, कुर्झुडकर सर, जयंत वडतकर, राजू कसंबे, किशोर रिठे, विजय घुगे, निलेश हेडा आणि मी असे एक ना अनेक लोक सरांच्या घराचा 'Hit me' सारखा उपयोग करायचो. मी तर मला काय वाटतं, ते कसं करणार या बद्दलची बरीच चर्चा करायचो. सर मात्र मनापासून प्रत्येक गोष्टीला संमती देत. परत जाताना आपल्याला काही अधिकचा सल्ला वगैरे मिळालेला नसे. तरीही सरांनी संयमित, शांतपणे ऐकून घेतल्याने आपण करतोय ते योग्यच आहे असा आत्मविश्वास निर्माण होई. ते काम केल्यानंतर झालेल्या चुका, राहून गेलेल्या गोष्टी लक्षात येत आणि मी पुन्हा सरांकडे जाऊन त्या सांगत असे. ही प्रक्रिया अनेकांनी पार पाडलेली आहे. दिसत असूनही चुका सांगायच्या नाहीत, त्या लक्षात येऊ देण्याचा संयम बाळगायचा आणि या संपूर्ण प्रक्रियेतून त्या व्यक्तीला सक्षम करायचे ! हा प्रकार सरांसारखा अतिशय शांत संयमी माणूसच करू शकतो.

पुढल्या काळात तर आपण एखाद्या दिशेकडे बोट करावं तर सर त्या दिशेचा शे-दीडशे कि.मी. चा प्रवास घडवून आणत. लहान मुलांसोबत करायचे काही काम, शिक्षण, पक्षीसंशोधन, संरक्षणाचा प्रकल्प असे काहीही असले तरी सरांकडे त्या त्या माणसाच्या स्वभावाप्रमाणे त्याला भावणारी, झेपणारी दिशा तयार असे. मात्र सरांच्या या मार्गदर्शनाच्या पुढे जबाबदारी मात्र ज्याची त्याला घ्यावी लागे.

आपल्या सोबत काम करणाऱ्या व्यक्तींच्या महत्त्वाकांक्षांचा बळी त्यांनी कधीच दिला नाही. किंबहुना अशी महत्त्वाकांक्षा त्यांना आवडे. कारण त्यासोबतच त्या व्यक्तीमध्ये जबाबदारी घेण्याची कुवतही तयार झालेली असे. नूतन भारत युवक संघ, निसर्ग सेवा संघ, व्हि.एन.एच.एस. सेंटर, सृजन, संवेदना अशा एक ना अनेक संस्था सरांच्या कामाच्या पध्दतीमुळेच तयार होऊ शकल्या. मात्र त्या नव्या संस्था म्हणजे जुन्यांची शकलं आणि जुन्या म्हणजे राहिलेले भग्नावशेष असे कधीही झाले नाही. त्या तर त्यांच्या सामुहिक विचारविश्वाला फुटलेल्या नव्या जोमदार शाखा-फांद्या असत. सरांच्या संस्थांचा वटवृक्ष असा जीवंतपणे विकेंद्रित होऊन वाढत असे.

वैयक्तिक जीवनात आपल्या विचारांचा प्रभाव असावा-दिसावा, ही सर्वसामान्य अपेक्षा आजकाल दुर्मिळ होत चालली आहे. मात्र सरांच्या वैयक्तिक जीवनात ते पाहायला मिळे. सर खादी वापरत, मात्र ते तिचा दिखाऊ वापर करत नसत. त्यांच्या विचारातले सगळे वाद त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यात ठिकठिकाणी भेटत-दिसत. त्यांची साधी राहणी, अतिशय हळू शांतपणे बोलणं आणि त्यांची भयंकर संथ दिनचर्या यांचा अनेकांना फार हेवा वाटत असे. सरांच्या मनोविश्वात आणि प्रत्यक्ष आयुष्यात जसे अगदी थोडे गांधी, सालीम अली, साने गुरुजी आणि भरपूर विनोबा, बाबा आमटे होते, तसेच सरांच्या जीवनात so called गुंड मवाली, रिक्षावाले, अनेक वंचित लोकही होते. गप्पा मारताना या

मंडळींची आठवण सर अनेकदा काढत आणि त्यांच्यातील त्यांना दिसलेलं माणूसपण सांगताना ते फार हळवे होत.

मला आठवतय, सर एकदा म्हणाले होते, 'मी स्वेच्छा दारिद्र्य स्वीकारेन पण दारिद्र्याची व्याख्या माझी असेल.' म्हणूनच त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे गांधीवादी, सर्वोदयवादी, संघवादी आणि पर्यावरणवादीं सारख्या अनेक वादींच्या शाळेचे ते 'Drop-out' होते.

लाडखेडकर मॅडमसोबतचं सरांचं सहजीवन अनेकांसाठी कुतूहलाचा विषय होता. सरांचं फिरणं, आलेल्या मंडळींशी तासन्तास गप्पा मारणं याबद्दल अनेकदा त्या तक्रारी करत, पण अनेकांना माहीत होत की सरांचं हे रसरसून जगणं त्यांना मनापासून आवडायचं. आम्हाला ते त्यांच्या चेहऱ्यावर दिसायचं. सर आणि मॅडम यांचा १२ व्या विदर्भ पक्षीमित्र संमेलनातला सहभाग सर्वांनी जवळून पाहिला आहे. सरांनी त्या संमेलनात काढलेला 'आता आम्ही म्हातारे झालो, पुढल्या संमेलनाआधी कोण टपकेल सांगत येत नाही' हा उद्‌गार अजय-योगिनी सोबत सर्वांनाच चटका लावून गेला. सरांच्या नंतर मॅडमची काळजी घेणारी अनेक मुलं त्यांच्या आसपास आहेत, त्यांच्या नातेवाईकांनीही नेहमीच सर आणि मॅडम यांची काळजी घेतली आहे.

सरांच्या जाण्यानं नुकसान तर झालेलं आहेच. पण जाताना ते आम्हाला अनेक पिढ्या पुरेल इतकं शहाणपण देऊन गेले आहेत. विचारांची दिशा त्यांनी जगून दाखवली आहे. जळगावच्या २४ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनातील आपल्या शेवटच्या भाषणात त्यांनी चळवळीसंदर्भातले ऐतिहासिक भाषण केलेलेच आहे. त्यातील मुद्यांचा विचार महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेने करायला हवा. त्यांना मिळालेला वादांचा, विचारशाळांचा वारसा त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे बदल करूनच जगून दाखवला आहे. त्यांनी सुरू केलेल्या कामाच्या दिशेला पुढे नेताना त्यांची आठवण वारंवार येत राहणार आहे, काढत राहावी लागणार आहे. प्रत्येक व्यक्तिमत्त्वात संधी असते, गुण असतात. ते विधायक कामात वापरता येतात आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षा बाळगूनही आपण एकत्रित येऊन काही काम करू शकतो हे सरांनी दाखवून दिलेले आहे. मात्र त्यासाठी तशा जागा तयार कराव्या लागतात हेही आपण पक्षीमित्र चळवळ, विदर्भ पर्यावरण परिषद या सरांचाही सहभाग असलेल्या वेगळ्या प्रयोगातून शिकलो आहोत. सामाजिक काम करताना ते विकेंद्रित, सार्वजनिक, सर्वसहभागी पध्दतीने आणि निरपेक्षपणे, करुणायुक्त मनाने करीत राहून अनेकांना शहाणं करावं आणि त्यातल्या काहींनी हा वारसा पुढे न्यावा हीच सरांना खरी आदरांजली ठरेल.

**कौस्तुभ पांढरीपांडे**
कारंजा (लाड), जि. वाशिम
९८८१४२२६५०

# ठाण्याहून प्रसिध्द होणारे द्वैमासिक 'परममित्र' म्हणते

कोणत्याही मोठ्या व महत्त्वाच्या कामाची सुरुवात ही अनौपचारिक व छोटीशीच असते. तसंच काहीसं या महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचं आहे. या संघटनेची बिजं १९८० साली १३-१४ पक्षीमित्रांची सभा श्री. प्रकाश गोळे यांनी लोणावळ्याला घेतली, तेव्हाच पेरली गेली. या सभेत दोन दिवस पक्षीनिरीक्षण, चर्चा, स्लाईड शो असा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्यावेळच्या चर्चेतूनच असे कार्यक्रम नियमितपणे घेण्यात यावेत अशी कल्पना पुढे आली. अनौपचारिकपणे दर वर्षी पक्षीमित्र संमेलन घ्यावे असे ठरले. अशाच वार्षिक संमेलनातून पक्षीमित्रांची संघटना असायला हवी हा विचार रुजू लागला. शेवटी १९९८ साली संस्था नोंदणीकृत झाली.

संघटनेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र असून तिचे कार्यालय चिपळूण येथे आहे. पक्षीमित्रांचे संघटन, विचारांची देवाणघेवाण, विविध पक्षीजातींचे संरक्षण, संवर्धन, प्रचार, प्रसार, जनजागृती इत्यादी विषयात संस्था प्रभावीपणे कार्य करत आहे, याची नोंद आपण घेतली पहिजे. व्यापक जनजागृतीच्या हेतूने संघटनेने 'पक्षीमित्र' नावाचे त्रैमासिक सुरु केलेले असून त्याचे संपादन नाशिक येथून पक्षीमित्र श्री. दिगंबर गाडगीळ हे करत असतात.

महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेची आजीव सभासदत्व वर्गणी रु. ५००/- इतकी आहे. सध्या संघटनेचे ४०० सभासद आहेत. सभासद कमी आहेत, ही कोणत्याही चांगल्या संघटनेची, उपक्रमांची नेहमीचीच ओरड आहे. महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनाही याला अपवाद नाही. चांगल्या उपक्रमांना पुरेसे सभासद न मिळणे हे या संघटनांचे दुर्दैव समजायचे की आपल्या भावी पिढ्यांचे ?

## नोबेल पुरस्कार विजेते पक्षीनिरीक्षक

१९५३ साली डीएनएच्या रचनेच्या शोधबद्दलचे नोबेल पारितोषिक संयुक्तपणे जेम्स वॅटसन यांना मिळाले होते. त्यांनी जन्मभर पक्षी निरीक्षणाचा छंद जोपासला होता.

# एक निरीक्षण - चिमण्यांचे

चिमणी हा लहानपणापासून माहीत असणारा छोटासा पक्षी आहे. ह्या पक्ष्याला माणसांचे सानिध्य आवडत असल्यामुळे घरातल्या कुठल्याही वळचणीला घरटे बांधत असे. त्यांचा उदरनिर्वाहही धान्य निवडत असताना सापडलेल्या अळ्या व पोरकिड्यांवर होत असल्यामुळे त्यांचा चिवचिवाट त्रासदायक वाटत नसे. उलट घरात घरटे बांधणे शुभ मानले जायचे.



अचानक ५-६ वर्षांपासून हा पक्षी अजिबात दिसेनासा झाला. सुरुवातीला स्थानिक स्थलांतर झाले असेल अशा समजुतीने दुर्लक्ष झाले. आता त्याची गंभीरता जाणवू लागली आहे व त्याची कारणमीमांसा होत आहे. ठाण्याच्या बारा बंगल्याच्या वस्तीत चिमण्या मोठ्या प्रमाणावर दिसत होत्या. मध्यम आकाराच्या पुत्रजिवी झाडावर त्यांचा रात्रथारा (Roosting) होता. ते झाड कापले गेले व चिमण्या दिसेनाश्या झाल्या.

तिथून जवळच असलेल्या तारांगणामध्ये जवळ जवळ ३५० कुटुंबे उंच इमारतीत राहतात. जवळून एका बाजूला उघडा नाला वाहतो. समोरच्या उड्डाणपुलावरुन रात्रंदिवस वाहतुक चाललेली असते. तरीही ह्या भागात भरपूर चिमण्या आहेत. उंच इमारतीच्या बाजूला पाण्याचे आणि सांडपाण्याचे नळ बाहेरुन दिसू नयेत म्हणून लोखंडी जाळी लावलेली आहे. त्याच्यातून चिमण्यांची सारखी ये जा चाललेली असते. कबुतरे मात्र आत येऊ शकत नाहीत. ह्या जागेचे वैशिष्ट्य म्हणजे कावळे फार कमी आहेत. इमारतींच्या एका बाजूला सगळ्या प्रकारची उंच झाडे आहेत व दुसऱ्या बाजूला बाग आहे. बागेला मध्यम आकाराचे बांबूचे, फायकसचे, कुंतीचे आणि कांचनचे कुंपण आहे व लॉनमध्ये बऱ्यापैकी गवत असते. ह्या बागेला शेणखत घालत असल्यामुळे बऱ्यापैकी कीटक व सूक्ष्मजीव असण्याची शक्यता आहे.

हे सगळे सविस्तर वर्णन करण्याचे कारण ह्या भागात गजबजाट भरपूर आहे. वाहतुकीमुळे हवेत विषारी वायुसुध्दा असणार. पण रस्त्याच्या बाजूला असलेल्या बांबूच्या झाडीतून चिमण्यांच्या चिवचिवाटाने पहाट उजाडते. जवळजवळ सूर्योदयाच्या अर्धा वा पाऊण तासाच्या आधी हा चिवचिवाट नर्तकाच्या हाळीबरोबर सुरु होतो. सूर्य थोडासा वर आला की तासाभरात सगळ्या चिमण्या उडून जातात. सकाळी अंगणात टाईल्सच्या मधले बारीक जीव वेचताना ६-७ चिमण्यांच्या जोड्या दिसतात. पण कबुतरे आली की उडून जातात. संध्याकाळी सगळ्या चिमण्या फायकसच्या झाडीत गोळा होतात. अंधाराची चाहूल लागली की सगळ्या बांबूच्या झाडीत नाहीश्या होतात. १०-१५ मिनिटांतच शांतता पसरते.

गेल्या सप्टेंबर महिन्यात चिमण्या मोजाव्यात ह्या विचाराने सतत ३ दिवस पहाटे साडेपाच वाजल्यापासून रस्त्याजवळच्या बांबूच्या झाडीजवळ बसलो. ही झाडी ५ फूट रुंद आणि १३ फूट लांब असून उंची ११ फूट आहे. ह्या झाडीतच सगळ्या चिमण्या असतात. त्याला लागूनच त्याच्या दुप्पट लांब असलेल्या बांबूच्या झाडीत एकही चिमणी नव्हती. त्या दिवशी ५१३ चिमण्या पूर्वेला उडाल्या आणि शेजारच्या बाभळीच्या झाडावर १-२ मिनिटे टेकल्या व परत त्याच बाजूला उडाल्या. ह्यातल्या १५३ परत बांबूच्या झाडीत गेल्या व परत आल्या. त्यामुळे उडालेल्या चिमण्यातून एकूण उडालेल्या चिमण्या वजा केल्या. दक्षिणेकडे १६४ चिमण्या उडाल्या. त्यातल्या २४ परत झाडीत आल्या. तासाभरात सगळ्या चिमण्या उडाल्या होत्या. हा अभ्यास वर्षभर करायचा विचार होता, पण जमले नाही.

चिमण्या लोखंडाच्या जाळीतूनच (३.५ सेमी × ५ सेमी) ये जा करीत. नायलॉनच्या (२.५ सेमी × ४ सेमी) जाळीतून एखादी चिमणी आत येते. कदाचित त्यांना लोखंडाच्या जाळीत जास्त आधार मिळत असावा. त्यामुळे लोखंडाची जाळी असलेल्या भागात वेगवेगळ्या आकाराची खोकी ठेवली. ती चारी बाजूने बंद करून एका बाजूला ४ × २.५ सेमी भोक पाडले. त्याच्यात गवताच्या काड्या, पिसे आणि धान्य ठेवले. त्याच्यातल्या १७ × १० सेमी च्या खोक्याजवळ ५ मिनिटातच ३ चिमण्यांच्या जोड्या चिवचिवाट करीत आत आल्या. एका जोडीने बाकीच्यांना हाकलून देऊन त्या खोक्याचा ताबा घेतला. त्याच्या नंतर दुसरी एकही चिमणी आत आली नाही. त्या खोक्याच्या वरच्या बाजूला एक्झॉस्ट फॅनची नळी (११ सेमी) उघडलेली आहे. त्याच्यातही शिरून आत जाऊन बघून आल्या. परत फेऱ्या मारुन परत गेल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजता चिमणी आली. चिमण्याला १०-१५ मिनिटे Call दिले. पण चिमणा आला नाही. चिमणी यायची call द्यायची. जाळीवर बसून मान वाकडी करून सारखी वर बघायची. कदाचित चिमण्याला ती जागा पसंत पडली नसावी. असे जवळ जवळ महिनाभर चालले आणि चिमणी पण येईनाशी झाली.

जवळजवळ महिनाभराने बहुतेक तीच जोडी (?) चोचीत

गवताची काडी किंवा पिसे किंवा कोवळी फांदी घेऊन यायला लागली. पण खोक्यात शिरताना दिसत नव्हत्या. अशा बऱ्याच फेऱ्या होऊ लागल्या. दहा दिवसांनी पाण्याच्या पाईपवर मिलन झालेले दिसले. दुसऱ्या दिवसापूसन चिमणाच निष्ठेने काड्या किंवा अन्न आणताना दिसायचा. त्याच वेळी नेमके एक कबुतर येऊन पाईपवर बसून चिमण्यांना घाबरवीत होते. चिमणा त्याच्यावर लक्ष ठेवून आत शिरायचा. चिमणी सरळ उडत येऊन घरट्यात शिरायची. तेवढ्यात एक्झॉस्ट फॅनमधून काड्या डोकावू लागल्या. त्याचा अर्थ पुठ्ठ्याचे खोके योग्य वाटले नसावे. जवळून पाहिल्यावर दोन अंडी दिसली. उत्सुकतेने अंड्यातून पिल्ले कधी बाहेर येतात ह्याची वाट बघू लागले.


एका रात्री एक्झॉस्ट पाईपच्या मधल्या भागातून चिमणीचा आवाज येऊ लागला. सकाळी एक्झॉस्ट फॅनच्या जवळून तोच आवाज येऊ लागला. ते ऐकून चिमणा, चिमणी चिवचिवाट करीत फॅन जवळ आली व परत गेली. दुपारी दोन वाजता फॅनमधून छोटी चोच बाहेर आली. हळूहळू त्याने आपले अंगही बाहेर काढले. आता ते फॅनच्या निसरड्या भागावर येऊन बसले. ओरडून ओरडून त्याचा कंठशोष झाला होता. धान्य आणि पाणी ठेवले पण त्याला ते खाता येत नव्हते. अंग आकसून परत फॅनमध्ये जायचे. चिमणा आणि चिमणी सारखे आत येऊन चिवचिवाट करून जात असत. पक्षी पकडणाऱ्यांना विनंती केली पण सगळे प्रयत्न विफल ठरले. शेवटी २५-२६ वर्षाचा अविनाश भगत नावाच्या मुलाने ५-१० मिनिटातच सफाईदार हाताने काढून त्याच्या घरट्यात ठेवले.

अशा नाट्यमय प्रसंगानंतर दुसऱ्या दिवशी तर पिल्लू घरात नव्हते आणि चिमण्यांची जोडी परत आलेली दिसली नाही.

महमद दिलावरने (Hornbill, April-June 2006) मध्ये असे म्हटले आहे की, चिमण्या नाहीश्या व्हायला १) कावळ्या, मांजराचे वैर २) अन्नाचा तुटवडा ३) गाडीत इंधनासाठी वापरले जाणारे Methyl Tertiary Butyl Ether ४) कीटकनाशक द्रव्ये ५) वळचणी नसलेल्या इमारती ६) Microwave Mobile फोनचे स्टेशन्स कारणीभूत असावेत. निरीक्षणाने कबुतरांशी असलेले चिमण्यांचे वैर हेही कारण संभवते.

**डॉ. कुसुम गोखले**
५२, धनिष्ठा तारांगण संकुल,
ठाणे (प.) ४००६०४

# गिधाडांचे 'नाक'



गिधाडे आकाशात उंच जागी विहरत असतात. इतक्या दुरून त्यांना मरून पडलेले जनावर कसे समजते ? एखादे जनावर मरून पडले की कावळे, कुत्रे तिथे गर्दी करतात. त्या हालचाली टिपून गिधाडे तेथे येत असावीत. पक्ष्यांची दृष्टी तीक्ष्ण असते. पण त्यांचे नाक फारसे तल्लख नसते. तेव्हा गिधाडांना सडक्या मांसाचा वास कसा कळतो ? तसा त्यांना कळत असावा ह्यासाठी जेम्स ऑडोबॉन यांनी प्रयोग केले होते. अत्यंत सडके, दुर्गंधी टाकणारे मांसाचे तुकडे त्यांनी फडक्यात गुंडाळून उघड्यावर टाकले. पण गिधाडे तिकडे फिरकली नाहीत. तेव्हा आपला अंदाज बरोबर नाही असा निष्कर्ष त्यांनी काढला. पण वास्तवात टर्की गिधाडे सडक्या मासाच्या वासावरुन मृत जनावरांपर्यंत पोहोचतात हे स्पष्ट झाले आहे.

पनामामधील शास्त्रज्ञांने वृत्तीय जंगलातील दाट झाडीत मेलेल्या कोंबड्या फेकल्या. पण गिधाडे फिरकली नाहीत. दुसऱ्या दिवशी त्या सडू लागल्या. वास पसरू लागला तेव्हा टर्की गिधाडे तिथे नेमकी पोहोचली. टर्की गिधाडे फार उंचावरून न उडता सुमारे २०० मीटर उंचीवर उडतात. तिथे त्यांना सडका वास आला की ती खाद्यावर झेपावतात. उंच उडणारी गिधाडे टर्की गिधाडांवर नजर ठेवून असतात. ती उतरली की इतर गिधाडे तिकडे पोचतात. पण मेलेल्या जनावरावर चोच टाकण्याचा पहिला मान राजगिधाडाचा. अगदी जाड कातडीही ते फाडू शकते. मृत शरीराचा वेगवेगळा भाग गिधाडांच्या वेगळ्या जाती पसंत करतात.

मास सडू लागले की त्यातून इथिल मरकॅप्टन ही दुर्गंधी पसरू लागते. याच वासाने टर्की गिधाडे मृत जनावरांपर्यंत पोचतात.

दूरदूर अंतरावर पाईपलाईनीतून नैसर्गिक वायू पोचवला जातो. पाईपात कुठे गळती झाली तर ज्वालाग्राही वायूमुळे आगीचा धोका असतो. ती गळती शोधण्याकरिता शास्त्रज्ञांनी उपाय शोधला आहे. नैसर्गिक वायू गंधहीन असतो. त्यात थोडा इथिल मरकॅप्टन वायू मिसळला तर गळतीच्या ठिकाणी तो सडका वास येऊ लागतो. अशा वासाचा शोध घेणारी टर्की गिधाडे, आपल्याला खाद्य मिळणार या आशेने नेमक्या ठिकाणी पोचतात. पाईपलाईनच्या दुरुस्तीसाठी नेमलेले तंत्रज्ञ त्या गिधाडांवर लक्ष ठेवून असतात व तेही दुरुस्तीसाठी तिथे पोचतात.

# शिक्षकदिन

आज बऱ्याच दिवसांनी काय महिन्यांनी माझ्या टेरेस बागेतील झाडांशी खूप वेळ गप्पा केल्या. त्यांची माती खुरपून काढली. त्यांना छान खत घातले, पाणी घातले आणि एकीकडे आमचा संवाद सुरु झाला. मनात म्हणत होते वाळलेली किती पाने पडत असतात. काय ह्याचा उद्देश असेल ? हा विचार गुलाबाच्या झाडाने ऐकला. झाड चक्क माझ्याशी बोलू लागले. म्हणाले, 'अग ही वाळकी पाने नकोशी झालेली आहेत. त्यापासून मला काहीच उपयोग नाही. मग कशाला जवळ बाळगायची ?' आणि मी विचारात पडले. खरंच आपणही नको असलेले विचार का बाळगतो ? ही आपली वाळकी पानेच आहेत. मग का आपण सतत जवळ बाळगून आठवत बसतो ? आपणही नको असलेल्या विचारांना लगेच टाकून द्यायला शिकायचे. मी गुलाबाच्या झाडाकडे आश्चर्याने बघितले, तर ते माझ्याकडे हसून बघतंय असं क्षणभर वाटले.

सोनचाफ्याजवळ आले आणि काय आश्चर्य ? दोन चार दिवसांपूर्वी मी त्याची काही पाने खुडली होती. पण आज नवी पालवी तयार होती. असे कसे घडले म्हणून विचारात पडले तर हे झाड हसत होते. मला म्हणाले, 'अग तुमच्यासारखे आम्ही रडत बसत नाही. वाईट घटना किंवा न आवडणाऱ्या गोष्टी मनाविरुध्द घडल्या तर सोडून द्यायच्या आणि नवी पालवी फुलवायची.' खरेच होते सोनचाफ्याचे म्हणणे. म्हणजेच नवे विचार आपणही फुलवले पाहिजेत. मनाविरुध्द गोष्टी ह्या घडतच राहणार. म्हणून रडत न बसता नवे विचार आणून विचारांचे कोवळे अंकूर आपणही फुलवायला शिकायचे. आणि एकदम लक्षात आले, आज शिक्षक दिन आहे. झाडे ही आज आपले 'शिक्षक' झाले आहेत. मग वर्षातून एकच दिवस आपण शिक्षकदिन म्हणून का पाळायचा ? खरे तर आपण रोज कोणाकडून काही ना काही शिकत असतो. म्हणून रोजच शिक्षकदिन पाळणार असे झाडांना वचन दिले. आपण झाडांकडून नेहमी घेतच असतो. पण आज मी त्यांना वचन दिले की,रोज मी तुमच्याकडून काही ना काही शिकणार, त्याचे आचरण करण्याचा प्रयत्न करणार. असे म्हणून आमचे हितगुज थांबवले.

असा आगळा शिक्षक दिन.


**सौ. गौरी सतीश गोगटे**
स्थिरभाष : ०२५३-२३४२४४९
चलभाष : ९९२२००१९३३

# श्रध्दांजली

बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे अध्यक्ष श्री. बी. जी. देशमुख, निवृत्त आयएअेस अधिकारी भारत सरकारचे निवृत्त कॅबिनेट सचिव यांच्या पाठोपाठ श्री. जे. सी. डॅनियल यांचेही २३ ऑगस्ट रोजी निधन झाले. ते १९५० मध्ये संस्थेत संशोधक म्हणून दाखल झाले. त्यानंतर क्युरेटर, डायरेक्टर, सेक्रेटरी अशा विविध नात्यांनी ते संबंधित राहिले. अनेक M.Sc./Ph.D. च्या विद्यार्थ्यांचे ते मार्गदर्शक होते. संस्थेच्या जर्नलचे व 'हॉर्नबिल' या त्रैमासिकाचे संपादन अनेक वर्ष त्यांच्याकडे होते.

त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यातील शेवटचे 'Birds of the Indian Subcontinent - A field guide' हे या वर्षीच प्रसिध्द झाले.

निसर्गरक्षणासाठी दक्ष असलेल्या या दोन्ही निसर्गसेवकांना 'महाराष्ट्र पक्षीमित्राची श्रध्दांजली.'



# चारोळी

वटवाघळांची झुंबड
संध्याकाळी उडते
बगळ्यांशी टक्कर
अनपेक्षीतच घडते.


★ ★ ★

पिलांबरोबर घुबड
पैलतिरावर गेले
म्हणजे समजायचे
तिकडचे दोन चार उंदीर मेले.

**अनिल माळी**

# स्वागत...

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. विजयसिंह दिनकरराव देशमुख | सातारा | ९८२२५२४२४० | deshmukhvijaysinh@gmail.com |
| श्री. शिवलाल बारे | जळगांव | ९४२०३४९७९० | |
| कु. श्रुती प्रदीप पाटील | सांगली | ०२३४२ - २५२०७६ | shrutisp6@gmail.com |
| श्री. यशवंत त्र्यंबक धांडे | जळगांव | ९७६५०४५२८१ | yashavantd@rediffmail.com |
| श्री. गणेश रघुनाथ जाधव | डोंबिवली | ७५८८२२००८७ | |
| श्री. महेश मनोहर आग्रे | रायगड | ९३२३८१४४७४ | agremahesh@gmail.com |
| श्री. मयुरेश माधव पेठे | रत्नागिरी | ९४२३२००२६८ | mayureshpethe@gmail.com |
| श्री. सत्यव्रत जामसंडेकर | कोल्हापूर | ९५५२३४००७७ | |
| श्री. मोरे मदन सखाराम | कोल्हापूर | ९९७५९४३९९७ | madan_more@yahoo.co.in |
| कु. कोमल दिलीप चिटणीस | कोल्हापूर | ०२३१ - २६९०७५५ | komal.archaeo@gmail.com |
| श्री. कौशल दिलीप चिटणीस | कोल्हापूर | ९८२२९४४१७७ | |
| सौ. माधवी दिलीप चिटणीस | कोल्हापूर | ९८७०५५१३७७ | chitnismadhavi@gmail.com |



अनिल माळी

## पक्षी मित्रांना आवाहन

आपली पक्षी निरीक्षणे, पक्षी अभ्यास, प्रकल्प, पक्ष्यांचे प्रथम दर्शन, शास्त्रीय पेपर इत्यादी पाठवावे. पक्षीमित्रमध्ये प्रसिधद् केले जाईल. लिखाण हाती लिहून, टाईप करुन ई-मेलने - pakshimitra@gmail.com वर अथवा पोस्टाने महाराष्ट्र पक्षीमित्र, ११, युनायटेड पार्क, मार्कंडी, चिपळूण या पत्त्यावर पाठवावे.



बुक-पोस्ट

प्रति,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
११, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण, जि. रत्नागिरी - ४१५ ६०५
फोन : (०२३५५) २५३०३०
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org

**पक्षीमित्र**
संपादक : श्री. दिगंबर गाडगीळ
(खाजगी वितरणासाठी)
वार्षिक देणगी मुल्य रु. १००/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी
संपादक सहमत असेलच असे नाही.
मुद्रक : एस्. व्ही. प्रेस - चिपळूण
फोन : (०२३५५) २५२३३०